# फिनोलेक्स ,मुकुल माधव फाऊंडेशनविधवा महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण

उस्मानाबाद/प्रतिनिधी

फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडची सीएसआर शाखा मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) उस्मानाबादच्या रखरखीत भूम ीत. जिथे दुष्काळ आणि शेतककऱ्यांच्या आत्महत्या यामुळे निराशेची छाया पडली आहे, विधवा महिला व शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करून त्यांच्या जीवनात आशेचे किरण आणत आहे. सामाजिक उत्तरदायित्वाप्रती मनापासून बांधिलकी ठेवून, मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) ने समाजाला भेडसावणारा संघर्ष कमी करण्यासाठी एक परिवर्तनात्मक प्रवास सुरू केला आहे. २०१९ मध्ये मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) ने स्थानिक एनजीओ साई मित्र परिवारासोबत सहभागिदारी करून सर्वसमावेशक गरजांचे सर्वेक्षण मूल्यांकन केले.